Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 10 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

**दिनांक: १० ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

ज्येष्ठ उद्योजक रतन टाटा यांच्या पार्थिवावर आज मुंबईत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत. सांस्कृतिक कला केंद्र इथं टाटा यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं असून, दुपारी चार नंतर नरीमन पॉइंट ते वरळी दरम्यान अंत्ययात्रा निघणार आहे. रतन टाटा यांच्या सन्मानार्थ राज्य सरकारने आज एक दिवसाचा शासकीय दुखवटा जाहिर केला आहे. रतन टाटा यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, यांच्यासह सर्वच क्षेत्रातल्या मान्यवरांनी दु:ख व्यक्त केलं आहे. टाटा यांचं काल रात्री मुंबईत निधन झालं, ते ८६ वर्षांचे होते.

****

उमंग ॲप आणि डिजिलॉकर सुविधा यांच्या एकत्रीकरणाची घोषणा राष्ट्रीय ई – गव्हर्नन्स विभागाने केली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरीकांना एकाच प्रणालीमधून विविध सरकारी सेवा सहजपणे मिळू शकणार आहेत. उमंग ॲप सर्व अँड्रॉईड मोबाईल धारकांसाठी उपलब्ध आहे, आणि त्याच्या सेवांचा वापर डिजिलॉकर ॲप च्या माध्यमातून करता येईल, असं इलेक्ट्रॉनिक्स आणि महिती तंत्रज्ञान मंत्रालयानं म्हटलं आहे.

****

राज्यात शेतीला पाणी उपलब्ध होण्यासाठी जलसंपदा विभागाच्या १२५ प्रकल्पांसाठी ८० हजार कोटी रुपयांच्या सुधारित प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. कोल्हापूर जिल्ह्यातल्या धामणी प्रकल्पाच्या घळ भरणी कामाचा शुभारंभ केल्यानंतर ते काल बोलत होते.

****

आगामी विधानसभा निवडणुकांसाठी महाविकास आघाडीमध्ये जागावाटपासंदर्भात आता केवळ १५ टक्के जागांवर अंतिम निर्णय बाकी आहे. दोन दिवसानंतर यासंदर्भात माहिती दिली जाईल, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं आहे. मुंबईत महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबत झालेल्या चर्चेनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

****

येत्या विधानसभा निवडणुकांसाठी वंचित बहुजन आघाडीने आपल्या दहा उमेदवारांची यादी काल जाहीर केली. यात औरंगाबाद मध्य विधानसभा मतदारसंघासाठी मोहंमद जावीद मोहंमद इसहाक तर परभणी मतदारसंघासाठी सय्यद सामी सय्यद साहेबजान यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय मलकापूर, बाळापूर, गंगापूर, कल्याण पश्चिम, हडपसर, माण, शिरोळ आणि सांगली या जागांसाठी पक्षानं उमेदवार जाहीर केले आहेत.

****

राज्यातल्या अनुसूचित जमातीसाठी राबवण्यात येणाऱ्या बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना आणि अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेच्या आर्थिक निकषांमध्ये सुधारणा आणि नवीन घटकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असं आवाहन कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे.

****

राज्यभरातल्या १२० आश्रमशाळा, वसतीगृह इमारतींचं लोकार्पण, तसंच भूमिपूजन आणि पायाभरणी काल राज्याचे आदिवासी विकासमंत्री विजयकुमार गावित यांच्या हस्ते झालं. गेल्या दोन वर्षांत आदिवासी बांधकाम विभागाने राज्यात ३ हजार ७५० कोटी रुपयांच्या आश्रमशाळा वसतीगृहांच्या इमारती बांधल्या असून याद्वारे विद्यार्थ्यांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या असल्याचं गावित यांनी सांगितलं.

****

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेतून बीड जिल्ह्यासाठी २८ हजार घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. यासंदर्भातला शासन निर्णय काल जारी झाला. विमुक्त जाती आणि भटक्या जमाती प्रवर्गातल्या गरजू नागरिकांना या योजनेतून स्वतःचं पक्के घर बांधण्यासाठी एक लाख २० हजार रुपये निधी दिला जातो.

****

धाराशिव इथं काल मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतल्या लाभार्थी महिलांचा मेळावा घेण्यात आला. यावेळी या योजनेसह मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण, यशस्वी उद्योजक महिला लाभार्थी, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती आणि महिला आर्थिक विकास महामंडळ या योजनांच्या प्रत्येकी पाच लाभार्थी महिलांचा, धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

****

धाराशीव जिल्ह्यातल्या नळदुर्ग इथं अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्यासाठी राज्य सरकारची मान्यता मिळाली आहे. या कार्यालयासाठी अप्पर तहसीलदार आणि महसूल सहाय्यक, या दोन पदांनाही शासनानं मान्यता दिली आहे.

****

नाशिक इथं वनखात्याने म्हसरुळ शिवारात बांधलेल्या वन्यप्राणी उपचार केंद्राचं लोकार्पण काल नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे यांनी केलं. या केंद्रामध्ये प्रशासकीय इमारत, वन्य प्राण्यांसाठी शस्त्रक्रिया कक्ष, पक्षी आणि प्राणी ठेवण्यासाठी पिंजरे अशी कामं झाली आहेत.

****

वाशिम जिल्ह्यातल्या मालेगाव तालुक्यात काल अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. सुदी शिवारात अंगावर वीज पडून एका शेत मजुराचा मृत्यू झाला.

****

महिलांच्या टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल दुबईत झालेल्या सामन्यात भारताने श्रीलंकेचा ८२ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करत भारतीय महिलांनी निर्धारित षटकात १७२ धावा केल्या. प्रत्यूत्तरादाखल श्रीलंकेचा संघ शेवटच्या षटकात ९० धावांवे सर्वबाद झाला.

****

पुरुष क्रिकेटमध्ये, दुसर्या टी – ट्वेंटी सामन्यात भारताने काल बांग्लादेशचा ८६ धावांनी पराभव केला. या विजयाबरोबरच भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत दोन – शून्य अशी विजयी आघाडी घेतली आहे.

****